# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (सकाळ)

जा.क्र. १३७ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १६/०३/२०१८

**१) मोबाईल दुकानातील मोबाईलची चोरी . :—**

दिंनाक १४+१५/०३/२०१८ चे २०.१० ते ०५.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी मोहसिन मोमीन शेख वय ३१ वर्ष, रा. साकोली याचे मालकीच्या बंद मेट्रो मोबाईल शॉपी दुकानाचे लोखंडी शटर्स वाकवुन कोणीतरी अज्ञात चोराने आत प्रवेश करुन दुकानात ठेवलेले सॅमसंग कंम्पनीचा मोबाईल मॉडल नं. जे—२ एक नग, १ नग सॅमसंग कंम्पनीचा मोबाईल मॉडल नं. जे—५ प्राईम, १ नग सॅमसंग कंम्पनीचा मोबाईल मॉडल नं. जे—७ एनएक्सपी, १ नग सॅमसंग कंम्पनीचा मॉडल नं. जे—२ प्रो, १ नग ओपो कंम्पनीचा मोबाईल मॉडल ए—३७,१ नग ओपो कंम्पनीचा मोबाईल मॉडल नं. ए—५७,१ नग व्हिओ कंम्पनीचा मोबाईल मॉडल नं. वाय — २१, १ नग व्हिओ कंम्पनीचा मोबाईल मॉडल क्र. वाय —२१ एल, नोकीया श्री कंम्पनीचा १ हॅडसेट असा एकुण—६७,१००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. निंबेकर हे करीत आहेत.

**२) गॅस टॅंकरने मोटार सायकलला धडक देवुन एकाचे मरणास व एकाला गंभिर दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिंनाक १५/०३/२०१८ चे ११.३० ते १२.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील गॅस टॅंकर ट्रक लाखनी कडुन नागपुर कडे एनएच—६ रोडने जात असता भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन मोटार सायकल क्र. एमएच ३६ एसी ४६०७ ला मागेहुन धडक मारुन मोटार सायकल चालक टिकाराम गणपत ठाकरे वय ५२ वर्ष, रा. मांढळ यास गंभिर दुखापत करण्यास व मागे बसलेला रविंद्र शामराव ढोके वय ५८ वर्ष, रा. बेलाटी याचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी मोरेश्वर रुपचंद कुथीरकर वय ३६ वर्ष, रा. जांबळी दोडके ता. स/ अर्जुनी जि. गोंदिया ह.मु. बेलाटी ता. लाखांदुर यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भादवी. सहकलम १३४/१७७,१८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. लांडे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) लाच लुचपत प्रतिबंधक यांची कारवाई . :—**

दिंनाक १५/०३/२०१८ चे ११.२७ वाजता दरम्यान यातील आरोपीने तक्रारी श्री. राजेश काशीराम बांडे वय ३४ वर्ष, रा. बोथली याचे खरेदी विक्री यांना त्याचे धान्य खरेदी विक्री परवान्याचे नुतनीकरण करुन देण्याकरीता १,०००/—रु. ची मागणी करुन त्यापैकी १८२/—रु. ची पावती देवुन उर्वरीत ८१८/—रु. स्वत:चे आर्थीक फायदयाकरीता पडताळणी कारवाही दरम्यान मागणी करुन सापळा कारवाही दरम्यान १,०००/—रु. स्विकारुन त्यापैकी १८२/—रु, ची कायदेशीर पावती देवुन उर्वरीत ८१८/—रु. अशी लाच रक्कम असे एकुण १,०००/—रु. कोणत्याही प्रकारचा प्रतीकार न करता स्विकारल्याने पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ७,१३(१)(ड),(१३) (२) भादवी. ला.प्र.का.सन.१९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. पारधी एसीबी भंडारा पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिंनाक १५/०३/२०१८ चे ०७.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी मिलींद रामदास लोणारे वय २६ वर्ष रा. कोल्हारा हा त्याचे घरासमोर तोंड धुत असतांनी यातील आरोपी याने फिर्यादीस तुझ्या घरच्या कोंबडया येवुन नासाडी करतात असे बोलुन फिर्यादी सोबत भांडण करुन काठीने डोक्यावर मारुन दुखापत कली व पुढे पाहुन घेण्याची दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**५) मानेवार काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिंनाक १५/०३/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील जखमी अमित विठोबा भेंडारकर वय २६ वर्ष, रा. रा. तई बु. याने आरोपी हटकले वरुन आरोपीने जखमी हा पाठमोरा झाला असल्याने त्याचे मानेवर काठीने मारुन जखमी केल्याने फिर्यादी नरेश शंकर भेंडारकर वय ४० वर्ष, रा. तई. बु. यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**६) संगनमत करुन पैश्याचे कारणावरुन आकोळी व काठीने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिंनाक १५/०३/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी मनोज मदन पटले वय ३१ वर्ष,रा. परसोडी याचे जखमी वडील मदन गोपाल पटले वय ५६ वर्ष, रा. परसोडी यांनी दिनांक ०२/०३/२०१८ ला होळी सना निमीत्त गावात बकरा कापुन बक–याचे मटन विक्री केली. असता त्या मटनाचे ४००/–रु. आरोपीकडे शिल्लक असल्याने ते पैसे जखमीने आरोपीस मागीतले असता आरोपीने भांडण करुन आरोपी क्र. १ ने आकोळी व आरोपी क्र. २ ने काठीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३२४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**७) अवैध हातभट्टी दारु अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १५/०३/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी व तुमसर येथे अवैध हातभट्टी दारु अडड्यांवर धाडी घालुन एकुण ०२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १८ लिटर हातभट्टी दारु १८००/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

(मपोउपनी. माया चाटसे)
महिला सेल भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.

## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

## ( दुपार )

जा.क्र. १३८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
**दिनांक १६/०३/२०१८**

**१) अज्ञात वाहनांच्या धडकेत एक जखमी . :–**

दिंनाक ०८/०३/२०१८ चे २१.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा काका जखमी राजकुमार तुकाराम साखरकर वय ५० वर्ष, रा. निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे काकास धडक दिल्याने रोडवर पडुन डोक्याला व पायाला मार लागल्याने त्यास औषधोपचारा करीता सेंटर पाईट हॉस्पीटल नागपुर येथे सध्या भरती असल्याने फिर्यादी सौरभ रामभाऊ साखरकर वय २४ वर्ष, रा. शुक्रवारी यांचे उशीरा तोंडी रिपोर्ट दिल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलची चोरी . :–**

दिंनाक १५/०३/२०१८ चे २०.१५ ते २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीने त्याची सिल्वर पट्टा असलेली स्पलेंडर प्लस मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु ६७७७ किंमती ४०,०००/–रु. ची डॉक्टरी देशकर नर्सीग होमचे बाजुला चायनीज दुकानाचे समोर ठेवुन नास्ता करीत असतांना फिर्यादीची मोटार ही कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी मुस्तफा गनी शेख वय ३० वर्ष, रा. अन्सारी वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) मुलीला लग्नाचे आमीष दाखवुन फसु लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिंनाक १४/०२/२०१८ चे १७.०० ते १५/०२/२०१८ चे ११.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची मुलगी हिला यातील आरोपीने लग्नाचे आमीष दाखवुन फुस लावुन पळवुन नेले आहे. असे फिर्यादीचे यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. खाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १५/०३/२०१८ चे १०.३० ते ११.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही परसोडी येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. धावडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. धावडे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**५) दारू पिवुन दारूच्या नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १५/०३/२०१८ चे १७.०० वाजता. दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील पॅशन प्रो मोटार सायकल ही दारु पिऊन दारुचे नशेत चालवितांनी मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे चेक केले असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. आडे वानिशा भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १८५(१) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोना. साबळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.